अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १० डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## जिल्हा कारागृहातील पोलीस कर्मचाऱ्याने स्वत:वरच झाडल्या गोळ्या

**सोलापूर** : सोलापूर शहरातील जिल्हा कारागृहामध्ये गार्ड म्हणून सेवेत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याने स्वतः वर तीन गोळ्या झाडून घेतल्याची घटना घडली आहे. शनिवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास हा धक्कादायक प्रकार घडला. विकास गंगाराम कोळपे (वय ३७ रा. जि. कारागृह वसाहत सोलापूर) असे या पोलिसाचे नाव आहे.

विकास कोळपे यांच्या स्वतःच्या फेसबूक अकाउंटवर त्यांनी संबंधित पाऊल उचलण्यापूर्वी दोघांची नावे घेतली आहेत. त्यांच्या त्रासाला कंटाळून आपण हे पाऊल उचलत असल्याचे म्हटले आहे आणि त्यात स्वतःच्याच पोस्टवर भावपूर्ण श्रद्धांजली असेही नमूद केले आहे.



गोळ्या झाडून घेतलेले विकास हे मूळचे पुणे जिल्ह्यातील देवाची आळंदी येथील रहिवासी आहे. दोन वर्षांपूर्वी तो सोलापुरातील जिल्हा कारागृहात बदलून आला होता. त्याने यापूर्वी २०१३ मध्ये कोल्हापूर, २०१६ येरवडा जेल पुणे, २०१७ अहमदनगर, २०१९ सांगली आणि २०२१ मध्ये सोलापूर जिल्हा कारागृहात मुख्य प्रवेशद्वारात गार्ड म्हणून कर्तव्य बजावत होते. शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास त्यांनी स्वतः जवळील एसएलआर बंदुकीतून स्वतःवर तीन गोळ्या झाडून घेतल्या. पोलीस शिपाई कोळपे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलले असल्याची चर्चा सुरू आहे.

# मराठ्यांकडे २० टक्के तर आमच्याकडे ८० टक्के मते

## ▪ ओबीसी मेळाव्यात छगन भुजबळांची जरांगे-पाटलांवर टीका
## ▪ मराठ्यांना कुणबी सर्टिफिकेट देणं थांबवण्याची केली मागणी

सुराज्य/इंदापूर

**मराठ्यांना कुणबी सर्टिफिकेट देणे ताबडतोब थांबवा, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी इंदापूर येथील सभेत केली. मनोज जरांगे-पाटील यांच्यावर छगन भुजबळ यांनी हल्लाबोल केला. आमच्या ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देऊ नका, आमची इतर कोणताही मागणी नाही, असेही भुजबळ यावेळी म्हणाले. मराठ्यांकडे २० टक्के, आमच्याकडे ८० टक्के मते आहेत. ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण आहे. प्रत्येक जमातीला ब्रॅकेट आहे. ओबीसी समाजाला सरकारी नोकऱ्या फक्त ९ टक्के मिळाल्यात. आधी २७ टक्के जागा भरा मग इतर गोष्टी करा, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्यावर टीकास्त्र सोडले. इंदापूर येथील सभेत मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे-पाटील यांच्यावर सडकून टीका केली.**



कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात जाती निहाय जनगणना झाली पाहिजे. त्यामध्ये अडचण काय आहे? बिहार करू शकते तर तुम्ही का जनगणना करीत नाही. मराठ्यांना कुणबी सर्टिफिकेट द्यायचे सुरु आहे ते थांबवा. न्यायमूर्ती शिंदे सगळीकडे जात आहेत आणि करून घेत आहेत. आमच्या २७ टक्केंतील आरक्षण दिले पाहिजे. पण ओबीसी मधून आरक्षण देता कामा नये. हे जर ऐकू कुणाला गेलं नाही, न्याय आपल्याला मिळाला नाही. तर पडळकर म्हणाल्याप्रमाणे सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है.. असंच करावे लागेल.

विचार करणारा मराठा समाज गप्प का? मराठा समाजाच्या मतांसाठी गप्प आहात का? मतं त्यांची आहेत, मग आमची नाहीत का? त्यांची लेकरं आहेत, मग आमची नाहीत का? असा सवाल यावेळी भुजबळांनी उपस्थित केला. त्यांची २० टक्के आणि ८० आमची आहेत. हर्षवर्धन पाटील, विजयसिंह पाटील तुम्हाला कुणबी सर्टीफिकेट पाहिजे आहेत का? सांगा ना पाहिजे का नाही? आमचे लोक गरिब का राहिले असते पण त्यांना काही काळतच नाही. आम्हाला २७ टक्के आरक्षण आहे. यात अनेक जाती आहेत. सरकारमध्ये फक्त आम्हाला ९ टक्के आरक्षण आहे. ते २७ टक्के भरा मग बाकीचे काही करा. असे म्हणत भुजबळ यांनी सगळे गणीतच मांडले.

### मनोज जरांगे-पाटलांवर कारवाई का नाही?

मी काही बोललो की, काही विद्वान लोक बोलायला लागतात की, दोन जातीत भांडणे लागत आहेत. जरांगे यांच्या सभा रात्री उशिरा चालतात, पोलीस कारवाई करीत नाही. कायदा फक्त आपल्याला त्यांना नाही. मी १५ दिवसांनी एकदा बोलतो, सौ सुनार की एक लोहार... काही बोलावे लागते, सगळंच ऐकून घ्यायची सवय नाही. राज्यात अशांतता निर्माण कोण करते? असा सवाल भुजबळांनी उपस्थित केला

### आधी २७ टक्के जागा भरा...

मराठ्यांकडे २० टक्के, आमच्याकडे ८० टक्के मते आहेत. ओबीसी समाजाला २ टक्के टक्के आरक्षण आहे. प्रत्येक जमातीला ब्रॅकेट आहे. ओबीसी समाजाला सरकारी नोकऱ्या फक्त ९ टक्के मिळाल्यात. आधी २७ टक्के जागा भरा मग इतर गोष्टी करा, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे-पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले.

# विरोध केलात तर पायाखाली तुडवायला वेळ लागणार

### मनोज जरांगे-पाटलांचा सर्व नेत्यांना इशारा

मराठा आरक्षणाबाबत सरकार काय काय करतंय, किती गांभीर्याने घेतंय हे समाज बघतोय. दि. २४ डिसेंबरपर्यंत मराठ्यांच्या आरक्षणाचा विषय मार्गी लागेल याची खात्री आहे. मराठे राजकारण्यांना फिरून दारालाही शिऊ देणार नाहीत. कारण आमच्यासाठी लेकरांचे हित महत्त्वाचे आहे. आम्ही ज्या नेत्यांना मोठे केले ते जर आमच्याच विरोधात जायला लागले तर आम्हाला त्यांना पायाखाली तुडवायला वेळ लागणार नाही, असा इशारा मनोज जरांगे-पाटील यांनी दिला आहे.

दि. २४ डिसेंबरपर्यंत आरक्षणाचा तिढा न सुटल्यास आपण मराठा समाज बांधवांसह मुंबईत धडकणार असल्याचे जरांगे म्हणाले होते. त्यामुळे मुदत संपण्यासाठी आता फक्त १५ दिवसांचा कालावधी राहिला आहे. मात्र, सरकारकडून अपेक्षित हालचाली होत नसल्याने मराठ्यांनो मुंबईला जाण्यासाठी तयार रहा असे थेट आवाहनच जरांगे यांनी नांदेडच्या नायगाव येथील सभेतून केले आहे. त्यामुळे सरकारच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.



मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, आमच्या लेकरांचे भविष्य आणि ते मोठे झाले पाहिजेत हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे.२४ डिसेंबरपर्यंत आम्ही वाट पाहू त्यानंतर या महाराष्ट्रातील मराठा काय चीज आहे हे त्यांना लक्षात येईल. थोडा धीर धरा.तुम्ही का पलट्या मारताय? तुम्ही विषय का घेत नाही याकडे आमचेही लक्ष आहे. तुम्ही काय करताय, काय करणार आहे यावर बारकाईने नजर आहे. मराठा समाजाला दिलेल्या आश्वासनावर काय करताय यावर माझ्यासह मराठा समाजाचे लक्ष आहे. शेवटी आमचा संयम बघायला लागला तर आमचा नाईलाज आहे. सरकारला पश्चाताप एवढा येणार की आजपर्यंत जीवनात कधीही आला नसेल असेही मनोज जरांगे-पाटील यांनी म्हटलं आहे.

### आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर इंदापूरमध्ये चप्पलफेक



भाजप आमदार गोपीचंद पडळकर इंदापूर दौऱ्यावर होते. सभा संपल्यानंतर आमदार पडळकर हे इंदापुरातील एका आंदोलन स्थळाला भेट देण्यासाठी गेले असता, शेजारीच मराठा समाजाकडून आरक्षण मागणीसाठीचे साखळी उपोषण सुरू होते. याच दरम्यान, पडळकर तिथे आल्यावरून मराठा बांधवांकडून पडळकर यांना जाब विचारण्यात आला. त्यावेळी मराठा बांधवांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. हे प्रकार सुरु असताना त्यांच्या दिशेने चप्पल फेकण्यात आली, अशी माहिती आहे. सदर प्रकारानंतर पडळकर हे घटनास्थळावरून निघून गेले.

## कत्तलखान्याकडे निघालेली ६० वासरे, तीन गायींची सुटका

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी बायपास रोडने ६० वासरे आणि तीन गायी घेऊन कत्तलखान्याकडे निघालेला पीकअप कुर्डुवाडी पोलिसांनी पकडला. ही कारवाई शुक्रवार, दि. ८ रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास कुर्डुवाडी बायपास रोडवर केली. याबाबत पो.कॉ.दीपक घोरपडे यांनी फिर्याद दाखल केली आहे. सदरच्या कारवाईनंतर पोलिसांनी वासरे आणि गायी मोडनिंब येथील गोशाळेत सोडण्यात आल्याचे सांगितले.

फिर्यादी पो.कॉ.घोरपडे आणि पो हे.कॉ.बागडे, पो. कॉ.दासरे हे टेंभुर्णी-कुर्डूवाडी बायपास रस्त्यावर पेट्रोलिंग करीत असताना त्यांना टेंभुर्णी-कुर्डुवाडी रोडने एका पीकअपमधून जनावरे कत्तलखान्याला घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार रात्री ८.३० वा सुमारास त्या रोडवरुन जाणाऱ्या महिंद्रा कंपनीचे बोलेरो पीकअप (एम.एच. १६- क्यु. ३५५४) या वाहनावर संशय आल्याने सदर पीकअप थांबविली.



पीकअपच्या पाठीमागील हौद ताडपत्रीने व फळयाच्या साहायाने झाकलेला होता. ताडपत्री काढून आतमध्ये पाहिले असता जर्शी जातीच्या काळया पांढ-या रंगाच्या व तांबूस रंगाची ६० लहान वासरांसह तीन गायी कोंबून भरलेल्या उभ्या अवस्थेत दिसल्या.

त्यावेळी पीकअप चालकाची चौकशी केली असता महिबूब बडिशा शेख (वय-२८, अयोध्यानगर, वेळापूर) असे त्याने नाव सांगितले. त्याच्यासोबत असलेल्या आषर्श सिकंदर कुरेशी (वय-१७, व्हनमाने प्लॉट, अकलूज) याचीही चौकशी होती. त्यांना ही वासरे कोठून आणले आहेत, त्याची पावती आहेत का, असे विचारले असता ही वासरे वेळापूर येथून आणल्याचे सांगितले. मात्र त्याच्या पावत्या नाहीत, असे सांगितले.

## गडगी नगरमध्ये तरुणाची आत्महत्या

**सोलापूर** : एका बावीस वर्षीय तरुणाने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना विडी घरकूल परिसरातील गडगीनगर येथे शनिवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. सुहेल सलीम बागवान (वय-२२, तुळजाई भोसलेनगर, विडी घरकूल) असे तरुणाचे नाव आहे. शनिवारी त्याचा मृतदेह गडगीनगर येथील अरिहंत शाळेजवळ असलेल्या विहिरीतील पाण्यात तरंगताना आढळून आला. तो बुधवारी घरातून गेला होता. तो फळ विक्रीचा व्यवसाय करीत होता. घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. कारण समजले नाही. तपास हवालदार नवले करीत आहेत.

## पोलीस असल्याची बतावणी करुन वृध्देच्या लाखांच्या बांगड्या पळविल्या

सुराज्य/मंगळवेढा

आम्ही पोलीस असून, पुढे एका महिलेचा सोन्यामुळे खून झाला आहे. तुम्ही एवढे सोने घालून कशासाठी फिरताय, अशी बतावणी करुन एका ७८ वर्षीय वृध्द महिलेचा विश्वास संपादन करुन तिच्या हातातील एक लाख रुपये किंमतीचे अडीच तोळे सोन्याच्या बांगड्या काढून घेऊन तिचा विश्वास घात केल्याप्रकरणी अज्ञात दोघा तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

यातील फिर्यादी प्रतिमा मनोहर पाटील (वय-७८, किल्ला भाग, मंगळवेढा) या गुरुवार, दि. ७ डिसेंबर रोजी सायंकाळी



साडेपाच वाजण्याच्या सुमारास किल्ला भागात फिरावयास गेल्या होत्या. यावेळी दोन अनोळखी इसमापैकी अंदाजे ३५ वर्षे असलेला तरुण जवळ येऊन म्हणाला, प्रमिला पाटील या महिलेचा सोन्यामुळे खून झाला आहे. तुम्ही एवढे सोने घालून कशासाठी फिरताय, मी पोलीस असू, त्याला पकडण्याच्या तपासावर आहे. तुमच्या हातातील सोन्याच्या बांगड्या मला द्या, मी तुम्हाला कागदामध्ये गुंडाळून व्यवस्थित तुमच्याकडे देतो, असे म्हणाला. दरम्यान, अंदाजे ३० वर्षीय दुसऱ्या इसमाने विश्वास संपादन करण्यासाठी त्याच्या गळ्यातील पिवळ्या धातूची चैन इसमाकडे देऊन फिर्यादीचा विश्वास संपादन केला. फिर्यादींच्या हातातील दोन सोन्याच्या बांगड्या घेऊन अज्ञात आरोपींने पोबारा केला. असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस करीत आहेत.

मंगळवेढा शहरातील मुख्य भागात भर दिवसा हा प्रकार घडल्यामुळे वयोवृद्धांची सुरक्षितता धोक्यात आल्याने या घटनेमुळे महिला वर्गातदेखील भीतीचे वातावरण पसरले आहे.

## महाराष्ट्र, कर्नाटकात एनआयएची मोठी कारवाई

**▪ ४४ ठिकाणी छापेमारी, इसिस महाराष्ट्र मॉड्युलच्या १५ जणांना अटक**

**मुंबई** : एनआयएने महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ४४ ठिकाणी छापेमारी केली असून, इसिस महाराष्ट्र मॉड्युलच्या इसिसच्या १५ जणांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये इसिस मॉड्युलच्या प्रमुखाचा देखील समावेश आहे. हा प्रमुख नवीन भर्ती करणाऱ्यांना 'बायथ'चे व्यवस्थापन करत होता. इसिसवर मोठ्या प्रमाणात कारवाई करताना शनिवार ९ डिसेंबर रोजी महाराष्ट्र आणि कर्नाटकात अनेक आणि व्यापक छापे मारून प्रतिबंधित दहशतवादी संघटनेच्या १५ जणांना अटक केली आहे.

एनआयच्या पथकांनी शनिवार ९ डिसेंबर रोजी पहाटे महाराष्ट्रातील पडघा-बोरिवली, ठाणे, मीरा रोड आणि पुणे आणि कर्नाटकातील बेंगळुरू येथे तब्बल ४४ ठिकाणी धाड टाकल्या. तसेच प्रतिबंधित



संघटनेच्या दहशतवाद आणि दहशतवादी कृत्यांना प्रोत्साहन देण्याच्या आरोपाखाली एकूण १५ आरोपींना अटक केली.

**प्रमुखालाही केली अटक**

मुख्य आरोपी आणि इसिस मॉड्यूलचा नेता आणि प्रमख साकिब नाचन हा प्रतिबंधित संघटनेत सामील झालेल्या व्यक्तींना 'बायथ' म्हणजेच इसिसच्या खलिफाशी निष्ठेची शपथदेखील देत होता. इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया इसीसच्या प्रयत्नांना व्यत्यय आणण्यासाठी आणि उद्ध्वस्त करण्याच्या एनआयच्या सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ही छापेमारी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणावर बेहिशेबी रोकड, बंदुक, धारदार शस्त्रे, दोषी कागदपत्रे, स्मार्ट फोन,इतर डिजीटल उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

## वडोली येथे दांडक्याने मारहाण


**सोलापूर** : वडोली (ता.माढा) येथे शेतात पाणी सोडल्याच्या कारणावरून लाकडी दांडक्याने केलेल्या मारहाणीत बिरू बापू कोकरे (वय ५० रा.वडोली) हे जखमी झाले. ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात बाळू ज्ञानदेव तरटे, त्याची पत्नी गीता आणि (भाऊ) शंकर तरटे या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. कोकरे हे शेतात काम करीत होते त्यावेळी तू आमच्या शेतात पाणी सोडू नको. असे म्हणत मारहाण केली. हवालदार भोसले पुढील तपास करीत आहेत.

## बहिणीच्या घरात भावाची आत्महत्या

**सोलापूर** : बहिणीच्या घरी आलेल्या ४० वर्षीय भावाने विषारी द्रव प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना पंढरपूर येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. पांडुरंग तानाजी शिंदे (वय-४०, मोडनिंब, माढा) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. तो पंढरपूर येथे आपल्या बहिणीच्या घरी राहण्यास गेला होता. त्याने मानसिक तणावातून विष प्राशन केले होते. त्याला राणी वाघमारे (बहीण) हिने पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आई जेऊ घालेना, बाप भीक मागू देईना !

कल्याण

124-72-129

# प्रियकरास बोलावून तलवारीने खुनाचा प्रयत्न

## ▪ नातेपुते येथील घटना : प्रेयसीसह पाच जणांवर गुन्हा तर दोघांना पोलीस कोठडी

सुराज्य/नातेपुते

घरासमोर ट्यूशन घेणाऱ्या शिक्षकांबरोबर प्रेम जुळले, लग्न करण्याचे दोघांनीही आणाभाका घेतल्या. दरम्यान तरुणीचे दुसरीकडे लग्न जुळल्याने प्रियकरास समजले. निराश झालेल्या शिक्षकोन तिला तू लग्न करून सुखी रहा, असे सांगितले. दरम्यान तिने आपण पळून जाऊन लग्न करू, अशी थाप मारून निर्जनस्थळी प्रियकराला बोलावले. त्यानंतर रात्रीच्या अंधारात पाच जणांच्या मदतीने तिने प्रियकरावर चाकू, तलवार आणि दगडाने हल्ला केला. जखमी अवस्थेत घाबरलेल्या प्रियकराने कॅनालमध्ये उडी टाकून आपला जीव वाचवला. ही सिनेस्टाईल घटना नातेपुते (माळशिरस) येथील फडतरी रोडलगतच्या कॅनालजवळ बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

दिनेश चंद्रकांत फडतरे (वय-३०, मोरोची, माळशिरस, सध्या रा. नातेपुते) असे गंभीर जखमी झालेल्या खाजगी शिक्षकाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी नातेपुते येथील रुग्णालयात दाखल केले. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून त्याची प्रेयसी अंकिता अंकुश कचरे (वय-२०), ओम कचरे (पांढरेमळा,नातेपुते), अनिल अंकुश शिंदे (माण, सातारा) छोटू (पूर्ण नाव नाही) आणि एक अनोळखी इसम अशा पाच जणांविरुद्ध नातेपुते पोलिसांनी खुनाचा प्रयत्न आणि शस्त्र अधिनियमन्वये गुन्हा दाखल केला. त्यापैकी अंकिता कचरे आणि अनिल शिंदे या दोघांना अटक करून पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

मोरोची येथे राहणारा दिनेश फडतरे हा सध्या नातेपुते येथील पांढरे मळा येथे वास्तव्यास आहे. तो ट्यूशन घेत असे. त्याच्या खोलीसमोर अंकिता कचरे ही महाविद्यालयीन तरुणी राहण्यास आहे. इंस्टाग्रामवरून दोघांचे प्रेम जुळले. दोघांनी लग्न करण्याचे ठरविले. दरम्यान, अंकिता कचरे हिचे दुसरीकडे लग्न ठरल्याचे फडतरे याला



समजले होते. तेव्हा फडतरेने तिला, तू हवे तिथे लग्न कर. मात्र तुला दिलेले १ लाख रुपये, एटीएम कार्ड आणि कोरा धनादेश आदी परत करण्याची मागणी केली. काही दिवसानंतर अंकिताने त्याला इंस्टाग्रामवरून संपर्क साधला. आपण दोघे पळून जाऊन लग्न करू, असे सांगितले. त्याला बुधवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास नातेपुते बायपास रोडवरील फडतरी रोड, कॅनॉलजवळ तिने बोलावले. ठरल्याप्रमाणे सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास तो कॅनॉलच्या पुलाजवळ गेला होता. त्या ठिकाणी अंकिता थांबलेली त्याला दिसली. तो तिला बोलण्यासाठी पुढे गेला. त्यावेळी अंकितासह पाचजणांनी मिळून त्याच्यावर लोखंडी रॉड, चाकू, तलवार आणि दगडाने मारहाण हल्ला चढवला. त्याला मारहाण केल्याने गंभीर अवस्थेत असलेल्या फडतरेने कॅनॉलच्या पाण्यात उडी टाकली. अंधारात काही अंतर पोहून गेल्यानंतर त्याला वस्तीवरील लोकांनी बाहेर काढले. नातेपुते पोलिसांना याची माहिती दिली.

पोलिसांनी त्याला रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, दिनेश फडतरे याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचाआदेश न्यायालयाने दिला. तपास फौजदार दिघे करीत आहेत.